# पार्किन्सन्स आणि होमिओपॅथी उपचार



**डॉ. संजीव डोळे**
एम्.डी. (होमिओपॅथी)

जेम्स पार्किन्सन्स या शास्त्रज्ञाने 'शेकिंग पाल्सी' या त्याच्या प्रबंधामध्ये या आजाराविषयी ३ महत्त्वाची लक्षणे सांगितली होती ती म्हणजे -

१) कंपने (ट्रेमर्स)
२) मंद हालचाली
३) स्नायूंचा जडपणा

**आजाराचे कारण**

पार्किन्सन्स हा आजार वृद्ध माणसांमध्ये सर्वसामान्यपणे आढळतो. साधारणत: ६० वर्षांनंतर या आजाराचे प्रमाण वाढत जाते. हजारांत १ या प्रमाणात हा आजार होण्याची शक्यता असते.

या आजाराचे कारण निश्चितपणे सांगता येत नाही; पण या आजारानंतर मेंदूपेशींमधील रंगीत पेशी Substantia Nigra यांचे प्रमाण कमी होते. डोपामाईन तयार होण्याची प्रक्रिया मंदावते.

**आजाराची लक्षणे -**

आजाराची लक्षणे वयाच्या ५०शी नंतर दिसायला लागतात. हा आजार स्त्री आणि पुरुष यांमध्ये समप्रमाणात आढळतो.

वर नमूद केलेली ३ लक्षणे आजाराच्या सुरुवातीस निदर्शनास येत नाहीत.

आजाराच्या सुरुवातीस खालील लक्षणे प्रामुख्याने दिसून येऊ शकतात.

१) काही कारण नसताना थकवा जाणवणे.
२) हात, पाय दुखणे.
३) विचार संथपणे होणे.
४) मानसिक ताण जाणवणे.
५) अक्षर लिहिताना बारीक होणे.

**जसजसा आजार जुना होतो, तशी त्याची लक्षणे वाढत जातात.**

१) चेहऱ्यावर भाव न दिसणे, त्वचा तेलकट वाटणे.
२) उच्चार स्पष्ट येत नाहीत.
३) चालताना अतिशय हळू उठावे लागते व हालचाली मंद गतीने होतात.
४) मागे वळताना तोल जातो.
५) चालताना थोडी पावले पटकन टाकली जातात. जणू काही पळल्यासारखी (Festinakon)

**आता जेम्स पार्किन्ससन्सने नमूद केलेल्या ३ लक्षणांची सविस्तर माहिती घेऊया.**

१) शरीर कंप पावणे (ट्रेमर्स)
२) मंद हालचाली (हायपोकायनेसिया)
३) स्नायूंचे जडत्व (मस्कूलस रिजिडिटी)

**१) शरीर कंप पावणे (ट्रेमर्स)**

बऱ्याच अंशी याच तक्रारीमुळे अनेक रुग्ण तपासणीसाठी डॉक्टरकडे येतात. मुख्यत्त्वेकरून हातांचा थरकाप, एकाच हाताची बोटे कापणे किंवा दोन्ही हात कंप पावणे ही तक्रार रुग्ण सांगतात.

उदा. चहाचा कप धरता न येणे, पेन उचलता न येणे.

पेन उचलले तरी स्वाक्षरी नीट न जमणे. भांडे हातात पकडता न येणे इ. पण काहीही काम न करता हात कंप पावतात हीच तक्रार अनेक वर्ष पार्किन्सन्समध्ये आढळून येऊ शकते; पण केवळ पार्किन्सन्समध्ये हाताचा थरकाप होतो असे नाही. यामागची कारणे अनेकानेक आहेत.(उदाहरणार्थ सर्व्हायकल स्पॉंडिलायटिस)

काही काम न करता नुसते बसलेले असताना कंप होणे

यालाच Tremors at rest असे म्हणतात व हे पार्किन्सन्सचे लक्षण आहे.

**२) मंद हालचाली**

चालायला सुरुवात करताना अतिशय हळू उठून चालावे लागते. हालचाल सुरुवातीला मंदपणे होते, हे देखील पार्किन्सन्सचे एक लक्षण आहे. ही तक्रार काही काळानंतर निर्माण होते.

काही लोकांना जलद हालचाली जमत नाही, तर काहींना सूक्ष्म हालचाली (उदा. शर्टाची बटने लावणे) जमत नाहीत.

बोटांच्या सूक्ष्म हालचाली अवघड वाटतात आणि त्या जमत नाहीत. एकच गोष्ट पुन: पुन्हा करता येत नाही.

**३) स्नायूंना जडत्व येणे**

यामुळे अजूनच हालचाली मंदावतात. तोल जाणे, एकाच जागी बऱ्याचवेळ थांबून पुढचे पाऊल टाकावे लागणे. उभे राहताना देखील वाकून उभे राहावे लागणे या तक्रारी दिसून येतात.

पार्किन्सन्समध्ये प्रथम तक्रारी शरीराच्या एका बाजूला होऊ शकतात; पण शरीराच्या दोन्ही बाजूंना तक्रारी असणे हेही पार्किन्सन्सचे लक्षण आहे.

स्नायूंच्या जडत्वामुळे बोलणे देखील स्पष्टपणे होत नाही. शब्दोच्चार अस्पष्टपणे होतात. बद्धकोष्ठता ही समस्या देखील स्नायूंच्या जडपणामुळे निर्माण होऊ शकते.

कंप हे पार्किन्सन्सचे प्रमुख लक्षण असते. तरी बाकीची लक्षणे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे. पार्किन्सन्सच्या कंपांचे वैशिष्ट्य म्हणजे ती झोपेत थांबतात आणि खूप थकवा आल्यास किंवा संताप आल्यास वाढतात.

उदासिनता जाणवणे, विस्मरण होणे, ही या आजारा-बरोबरीने दिसणारी लक्षणे आढळू शकतात; पण पूर्णपणे स्मृतिभ्रंश होणे हे पार्किन्सन्सचे लक्षण नाही.

**पार्किन्सन्स आणि होमिओपॅथी**

पार्किन्सन्स या आजारावर होमिओपॅथी उपचारपद्धती प्रभावकारी ठरू शकते. या उपचार पद्धतीमुळे पार्किन्सन्सची लक्षणे तर कमी होतातच त्याच बरोबरीने पार्किन्सन्समुळे येणारी मानसिक लक्षणे देखील निघून जातात.

होमिओपॅथी शास्त्रामध्ये कोणताही आजार हा रुग्णाचा पूर्ण अभ्यास करूनच बरा करता येऊ शकतो. प्रत्येक रुग्ण हा इतर रुग्णांपेक्षा वेगळा असतो. असे होमिओपॅथीत मानले जाते आणि म्हणूनच पार्किन्सन्स हा आजार प्रत्येकाचा वेगळा मानून अभ्यासला जातो.

प्रत्येक रुग्णाची शारीरिक लक्षणे, तर लक्षात घेतलीच जातात. त्याबरोबरीने मानसिक लक्षणे, स्वभाव, खाण्यातील आवडी-निवडी, ऋतूबदलातील लक्षणे या सर्व गोष्टींचा अभ्यास केला जातो.

पार्किन्सन्सची लक्षणे जी त्या रुग्णात आढळतात ती सामान्य लक्षणे (Common symtoms) मानली जातात; परंतु पार्किन्सन्सशी निगडित नसलेली; पण त्या रुग्णात आढळणारी विशिष्ट लक्षणे (Characterstics symptoms) यांना होमिओपॅथीमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

**पार्किन्सन्ससाठी वापरण्यात येणारी काही होमिओपॅथिक औषधे खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| **जेल्सेमियम** | मॅग फॉस | मर्क्युरियस |
| **अर्जेंटम नायट्रिकम** | लॅथिरस | |
| **अगॅरिकस** | **ऱ्हस टॉक्स** | |
| **ॲबसिंथसिस** | फायसोस्टिग्मा | |
| कॉक्युलस | अँब्राग्रिसिया | |

**१) जेल्सेमियम :-**

या औषधाचे गुणधर्म मुख्यत्त्वे मेंदूशी निगडीत आहेत. थकवा सतत जाणवणे, सतत झोप/डोळ्यावर झापड येणे, मंदपणा, नाडी अतिशय मंद, स्नायूंची शिथिलता ही या औषधाची प्रमुख लक्षणे आहेत.

हालचाली मंदावणे, स्नायूंची शिथिलता, हाताच्या स्नायूंना गोळे येणे, लिहिताना हातात गोळे येणे, हाता-पायांत ताकद नसल्यासारखे जाणवणे, थोड्याशा हालचालीने देखील खूप थकवा जाणवणे.

झोप किंवा डोळ्यावर सतत झापड असते; पण झोप लागत नाही. सतत विचारामुळे किंवा खूप थकल्यामुळे झोप न लागणे.

या औषधाचे गुणधर्म थंड, दमट हवेमध्ये वाढतात, धुके, दुःखद घटना, धुम्रपानाने देखील लक्षणात वाढ होते. सर्व लक्षणे लघवी केल्यावर कमी होतात. मोकळ्या हवेत बरे वाटते, पुढे वाकल्यावर किंवा सतत हालचालीने बरे वाटते.

**२) अर्जेंटिकम नायट्रिकम**

या औषधाचे मुख्य लक्षण विशेषत्त्वाने मेंदू व मज्जारजूंशी निगडीत आहेत.

मानसिक आणि शारीरिक तोल सांभाळता न येणे, हातापायांचा थरकाप, थकवा जाणवणे, डोळे बंद करून नीट चालता येत नाही.

सतत काहीतरी गोड खावेसे वाटते; पण गोड खाण्याने लगेचच जुलाब होतात.

मानसिक ताण सहन होत नाही. तक्रारी हळूहळू वाढतात आणि संथ गतीने कमी होतात.

उष्ण तापमान सहन होत नाही.

स्मृती कमी होणे, ताण सहन न **होणे**, कोणत्याही लग्न कार्याला जाण्यापूर्वी लघवी किंवा **शौचास** जाण्याची सतत भावना होणे ही या औषधाची **काही प्रमुख लक्षणे** आहेत.

**३) मर्क्युरियस**

या औषधाचे **प्रमुख लक्षण** म्हणजे शरीरात कंप निर्माण होणे हेच आहे.

**थोड्याशा श्रमाने कंप निर्माण** होतात.

**हातापायात ताकद न**सल्यासारखे जाणवणे.

**पूर्ण शरीर कंप पावणे**, त्यात जास्त करून हाताचा कंप **जाणवतो.**

**पायावर सूज असू**न, हात-पाय थंड असतात. सांध्यांमध्ये खूप **दुखणे.**

**याबरोबरीने** तोंडाला वारंवार घरे पडणे, सूज येणे. खूप **थकवा जाणवणे**, वारंवार शौच्याला आव पडणे, तक्रारी रात्री **वाढणे ही काही** निवडक लक्षणे मर्क्युरियसची आहेत.

**४) अर्गॅरिकस**

**अंगाचा थरकाप, सतत** मुंग्या येणे, स्नायू उडल्यासारखे **वाटणे या प्रमुख लक्षणांसाठी अर्गॅरि**कसचा उपचार करतात.

**स्नायूंचा जडपणा, कंपन मुख्यत**: पायाचे, पायात वात किंवा गोळे, **चमका येणे, पाय बधिर** वाटून मुंग्या येणे, तोल जाणे, सरळ चालता **येत नाही, सतत तोल** गेल्यासारखे वाटणे.

संधिवाताच्या तक्रारी **ज्या चालल्याने बऱ्या** वाटतात, खुब्याच्या हाडात दुखणे, तक्रारींचे **वैशिष्ट्य म्हणजे** जर उजवा हाताच्या तक्रारी असतील, तर त्या **बरोबरीने डाव्या पायाच्या** तक्रारी असतात.

हाता-पायांच्या कंपनाबरोबरीनेच **डोळ्यांची सुद्धा कंपने** जाणवतात. तसेच, वाचन करणे सुद्धा अवघड **जाते.**

**५) लॅथिरस**

या औषधाची लक्षणे प्रामुख्याने मज्जारज्जूंशी निगडीत असतात.

हाताच्या बोटांना बधिरपणा जाणवणे, चालताना तोल जाणे, स्नायूंना जडत्व आल्यासारखे वाटणे व म्हणून हालचाली अवघड जाणे.

चालताना गुडघे एकमेकांवर आपटतात, पायाचे स्नायू कडक झाल्याची भावना, पोटऱ्यांचे स्नायू कडक होतात, रुग्णाला पुढे वाकून चालायला लागते, सरळ होताना खूप कष्ट पडतात.

**६) हेलोडर्मा**

हात-पाय बधीर झाल्यासारखे वाटतात, कंपने जाणवतात, चालताना सतत तोल जातो, चालता येत नाही.

चालताना आपण एखाद्या स्पंजवर चालतो आहोत असे वाटते. पाय जड जाणवतो. तसेच, पायऱ्या/जिने चढताना त्याची उंची लक्षात येत नाही व उगीचच पाय जास्त वर नेला जातो.

**७) झिंकम फॉस**

या औषधाची कंपने ही मुख्यत: चेहऱ्यात आणि डोक्यात जाणवतात.

मेंदू खूप थकल्याची भावना, मानसिक ताण सहन होत नाही. चक्कर आल्याचे जाणवते.

रात्री झोप लागत नाही.

ही होमिओपॅथिक औषधे या आजाराच्या लक्षणांशी जरी मिळती जुळती असतील तरी तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ती घेणे. हितकारक आहे.

आजाराची लक्षणे व औषधाची लक्षणे (गुणधर्म) एकच असण्यावर होमिओपॅथीत मुख्य भर असतो.

संजीवन होमिओपॅथिक ट्रीटमेंट सेंटर
जयानंद कॉम्पलेक्स, ५६९ नारायण पेठ, पुणे ४११०३०
दूरभाष :- (क्लिनिक) २४४६३४९ (घर) २४४२९७१८
भ्रमणभाष :- ९८२२०५७१०७